**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक १२ ऑगस्ट २०२५**

**ठळक बातम्या**

- **महाराष्ट्र पोलिस दलात सुमारे 15 हजार पोलिस भरतीस राज्य मंत्रीमंडळाची मंजुरी.**
- **राज्यातील रास्त भाव दुकानदारांच्या मार्जिनमध्ये वाढ. सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्य वितरण.**
- **नागपूर महानगरपालिकेच्या तिरंगा मॅरेथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद, अबाल वृद्धांचा सहभाग.**
- **१३ ते १५ ऑगस्ट पर्यंत नागपूर जिल्हयात वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट.**

**मंत्रिमंडळ निर्णय**

राज्याच्या पोलीस दलात सुमारे १५ हजार शिपाई भरती करायला राज्य मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे. मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. भरतीमध्ये सन २०२२ आणि सन २०२३ मध्ये संबंधित पदाची विहित वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांनाही एक वेळची विशेष बाब म्हणून अर्ज करता येणार आहे आणि भरती प्रक्रियेत सहभागी होता येणार आहे. यात पोलीस शिपाई पदासाठी १० हजार ९०८, पोलीस शिपाई चालक पदासाठी- २३४, बॅण्डस् मॅन पदासाठी २५, सशस्त्री पोलीस शिपाई पदासाठी २ हजार ३९३ तर कारागृह शिपाई पदासाठी ५५४ इतकी पदं भरली जाणार आहे. पोलीस शिपाई आणि कारागृह शिपाई ही पदे गट-क संवर्गातील आहेत. पोलीस शिपाई भरती प्रक्रिया त्या-त्या जिल्हास्तरावरून राबविण्यात येते. त्यासाठी ओएमआर (OMR) आधारित लेखी परीक्षा घेण्यात येईल.

राज्यातल्या रास्त भाव दुकानदारांच्या नफ्यात वाढ करण्याचा निर्णयही मंत्रिमंडळानं घेतला. आता या दुकानदारांना प्रतिक्विंटल दीडशे ऐवजी १७० रुपये फायदा मिळेल. या निर्णयामुळे दरवर्षी सुमारे ९२ कोटी ७१ लाख रुपयांची अतिरिक्त तरतूद केली जाणार आहे. याशिवाय, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाअंतर्गत येणाऱ्या महामंडळांतर्फे राबवण्यात येणाऱ्या विविध कर्ज योजनेतल्या जामीनदारीच्या अटी शिथिल करायला आणि शासन हमीला पाच वर्षांची मुदतवाढ द्यायलाही मंत्रिमंडळानं मंजुरी दिली.
'एक देश-एक निवडणूक/यशवंत वर्मा

'एक देश- एक निवडणूक' विधेयकावर संयुक्त संसदीय समितीचा अहवाल सादर करण्यासाठी लोकसभेने मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार हा अहवाल आता संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यातल्या पहिल्या दिवशी सादर करता येईल. भारतीय जनता पक्षाचे खासदार पी.पी चौधरी यांनी आज लोकसभेत हा प्रस्ताव मांडला होता. यांना पदावरुन हटवण्यासाठी महाभियोग चालवण्याचा प्रस्ताव आज लोकसभेत सादर झाला. सभापती ओम बिरला यांनी सांगितलं की, महाभियोग चालवण्याचे १४६ सदस्यांचे प्रस्ताव सभागृहाला मिळाले आहेत....

*माननीय इलाहाबाद उच्च न्यायालय के वर्तमान न्यायाधीश न्यायमूर्ति यशवंत वर्मा को न्यायाधीश जांच अधिनियम, 1968 की धारा तीन के साथ भारत के संविधान के अनुच्छेद 124(4) के साथ पठित अनुच्छेद 217 और अनुच्छेद 218 के अंतर्गत उच्च न्यायालय के न्यायाधीश के पद से हटाने के लिए एक समावेदन प्रस्तुत करने का प्रस्ताव है। यह सदन संकल्प करता है कि इलाहाबाद उच्च न्यायालय के न्यायमूर्ति यशवंत वर्मा को उनके निम्नलिखित पदाचार के लिए पद से हटाने के लिए महामहिम राष्ट्रपति जी को एक समावेदन प्रस्तुत किया जाए।*

न्यायमूर्ती वर्मा यांच्यावरच्या आरोपांचं गंभीर स्वरुप लक्षात घेऊन त्या प्रकरणी चौकशीसाठी तीन सदस्यांच्या समितीची घोषणा सभापतींनी केली. त्यात सर्वोच्च न्यायलयाचे न्यायमूर्ती अरविंद कुमार, मद्रास उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश महिंद्र मोहन श्रीवास्तव आणि ज्येष्ठ विधिज्ञ बी.व्ही. आचार्य यांचा समावेश आहे. न्यायमूर्ती वर्मा दिल्ली उच्च न्यायालयात पदावर असताना त्यांच्या निवासस्थानी मोठ्या प्रमाणावर रोकड आढळल्यानंतर त्यांच्या विरुद्ध महाभियोग चालवण्याची चर्चा सुरु झाली आहे.

**'हर घर तिरंगा' राष्ट्रीय-स्थानिक**

स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर राबवण्यात येणाऱ्या 'हर घर तिरंगा' अभियानाचा देशभरात उत्साह दिसून येतआहे. ठिकठिकाणी तिरंगा फेरीसह विविध कार्यक्रम राबवले जात आहेत. सांस्कृतिक मंत्रालयाच्यावतीने आज दिल्लीत तिरंगा दुचाकी रॅली काढण्यात आली. सांस्कृतिक आणि पर्यटन मंत्री गजेंद्रसिंह शेखावत, केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी फेरीचं नेतृत्व केलं. जम्मू काश्मीरची राजधानी श्रीनगर इथं देखील आज तिरंगा यात्रा काढण्यात आली. याशिवाय देशाच्या आणि राज्याच्या विविध बहगत बहुविध आयोजन करण्यात आले. आज सकाळी साडेपाच वाजता नागपुरात तिरंगा मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आलं. यात नागपूरकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दाखवत शेकडो नागपूरकर 'एक दौड देशभक्ती साठी' मॅरेथॉन मध्ये सहभागी झाले. यावेळी महानगरपालिका आयुक्त डॉ.अभिजीत चौधरी देखील प्रामुख्याने उपस्थित होते. अबाल वृद्धांच्या सहभागाचे त्यांनी कौकटूक केले -

*पार्टिसिपेंट्स में 10 साल के से भी छोटे जो बच्चे थे, वो और 80 के ऊपर के भी जो यंग ऍट हार्ट लोग है, वो सभी लोगों ने यहाँ पे पार्टिसिपेट किया तो बॉयज एंड गर्ल्स एव्रीबडी पार्टिसिपेटेड अच्छा रिस्पांस रहा इस मैराथन को महानगरपालिका के तरफ से हर घर तिरंगा उपक्रम में विविध उपक्रम हम आयोजित कर रहे हैं, और 15 तारीख को सभी ने अपने घरों पे तिरंगा हॉईस्ट करके हर घर तिरंगा का जो एक स्पिरिट है वो हमें हमारे नागपुर सिटी के तरफ से दिखाना है।*

मुख्यमंत्री निवास पासून सुरू झालेली ही मॅरेथॉन, जापनीज गार्डन होत अनुराधा न्यायमूर्ती बंगला इथं समाप्त झाली. समारोपाच्या वेळी विजेत्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आलं.

**मांस विक्री**

नागपूर महानगरपालिकेद्वारा स्वातंत्र्य दिन आणि श्रीकृष्ण जयंती अर्थात जन्माष्टमी निमित्त शुक्रवार १५ ऑगस्ट रोजी शहरातील सर्व कत्तलखाने आणि मांस विक्रीची दुकाने बंद राहणार आहेत. असे आदेश मनपाचे घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त राजेश भगत यांनी निर्गमित केले आहे.

**हवामान**

नागपूर जिल्ह्यात उद्या पासून अर्थात दिनांक १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीमध्ये काही ठिकाणी वादळीवारा तसेच विज गर्जना आणि एक ते दोन ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता वर्तवलेली आहे. या तीन दिवसाकरीता येलो अलर्ट जारी केला आहे. याशिवाय नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्राने उद्या चंद्रपूर गडचिरोली यवतमाळ येथे मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट घोषित केला असून आज पुर्वविदर्भातील सर्वच जिल्हयाच्या तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम पावसाची शक्यता वर्तविली आहे. सद्यस्थितीत नागपुर जिल्ह्यातील मोठे आणि मध्यम स्वरूपाचे धरणे जवळपास ७०% तर लघु प्रकल्प जवळपास ७५ टक्के भरलेले आहेत. नदी व नाले यांना अतिवृष्टीमुळे चांगला प्रवाह आहे.जिल्ह्यातील नागरिकांना आणि शेतकयांना सतर्क राहण्यास सांगण्यात आले आहे. अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर अखेर भंडारा जिल्ह्यात आज पावसाने हजेरी लावली आहे. आठवडाभरापासून पावसाअभावी शेतकरी चिंतेत होते. विशेषतः धान शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना पेरणीसाठी आवश्यक असलेल्या पावसाची प्रतीक्षा होती.

**मनसे प्रतिनिधी**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवणुकीच्या पार्श्वभूमीवर मनसेच्या प्रतिनिधी मंडळाने आज निवडणूक आयोगाच्या कार्यालयात जाऊन आयुक्त दिनेश वाघमारे यांची भेट घेतली. प्रभाग पद्धत नको, एक वॉर्ड एक उमेदवार अशा पद्धतीने निवडणूक प्रक्रिया राबवावी तसंच मतदानाच्या वेळी व्हीव्हीपॅटचा वापर करावा, अशी मागणी त्यांनी केली. पालिका निवडणुकीआधी विशेष पुनरिक्षण कार्यक्रम तातडीने राबवण्याची मागणी आपण निवडणूक अधिकाऱ्यांकडे करणार असल्याचं मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी सांगितलं.

**शोकसभा**

राष्ट्र सेविका समितीच्या चौथ्या मुख्य संचालिका प्रमिलताई मेढे यांचे ३१ जुलै रोजी निधन झाले. उद्या, बुधवार, 13 ऑगस्ट रोजी सायंकाळी 6 वाजता व्यास सभागृह, स्मृती मंदिर, रेशीमबाग इथं शोकसभेचं आयोजन करण्यात आलं आहे. यामप्रसंगी मुख्य संचालक शांताकुमारी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सहकार्यवाह कृष्ण गोपाल आणि माजी लोकसभा अध्यक्षा सुमित्रा महाजन उपस्थित राहणार आहेत.

**रानभाजी महोत्सव**

पाश्चिमात्य फास्टफुडपेक्षा आपल्याला निसर्गाकडून विविध चवींच्या आणि आरोग्याला हितकारक अशा रानभाज्या मिळालेल्या आहेत. श्रावण महिन्यात या आरोग्यदायी पौष्टिक आणि औषधी गुणयुक्त असलेल्या रानभाज्या मुबलक प्रमाणात आपल्या भोवताली उपलब्ध असतात. नागरिकांनी आरोग्याचे भान ठेवून फास्टफुडच्या आहारी जाणाऱ्या युवा पिढीपर्यंत पारंपारिक रानभाज्यांची चव व आरोग्यमूल्य पोहचवावेत, असे आवाहन कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी केले. पश्चिम नागपूरच्या रामनगर मैदान येथे जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. या रानभाजी महोत्सवाला नागपूरकरांनी चांगला प्रतिसाद देत रान भाज्यांचे दैनंदिन जीवनातील महत्व जाणून घेतले.

**छायाचित्र प्रदर्शन**

माहिती आणि  प्रसारण मंत्रालय, भारत सरकारच्या केंद्रीय संचार ब्यूरो, क्षेत्रीय कार्यालय, नागपूर आणि जिल्हा प्रशासन, गोंदिया, जिल्हा परिषद गोंदिया, जिल्हा माहिती कार्यालय, गोंदिया यांच्या संयुक्त विद्यमाने उद्या पासून अर्थात 13 ते 15  ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 10 ते सायंकाळी 5 यावेळेत गोंदिया येथील जयस्तंभ चौकातील नविन प्रशासकीय इमारत येथे विकसित भारताचा अमृत काळ सेवा, सुशासन, गरीब कल्याणाची 11 वर्षे आणि स्वातंत्र्याची अमृत गाथा या विषयावर मल्टिमीडिया छायाचित्र प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. सर्वांना प्रवेश नि:शुल्क असून नागरिकांनी प्रदर्शनाला भेट द्यावी, असे आवाहन माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकारच्या केंदीय संचार ब्यूरोचे क्षेत्रीय प्रचार अधिकारी हंसराज राऊत यांनी केले आहे.

*****